सूर्यवंशी क्षत्रिय ज्ञाति समाज, मुंबई

१७५

स्थापना:१८४५

# शतकोत्तर अमृत महोत्सव

मनस्वी नात्याचा लखलखता सोहळा,
प्रारंभ नव्या संकल्पांचा



## सूर्यवंशी क्षत्रिय ज्ञाति समाज बंधु-भगिनींना सप्रेम नमस्कार!

हा एक विलक्षण योग नाही आणि जमून आलेला योगायोग तर नाहीच नाही...
शतकोत्तर अमृत महोत्सव ही आहे लखलखती विजय पताका
सूर्यवंशी क्षत्रिय समाजाचीआणि निरलस सेवेची..
ही विजय पताका सांगते कहाणी जाज्वल्य निष्ठेने, नि:स्वार्थ वृत्तीने
मानवी नात्यांमधला अथांग विश्वास वाढवत नेणाऱ्या समाज-धुरिणांची ..
ही विजय पताका म्हणजे शुभंकर शंखनाद..
हा शंखनाद आहे आजवर मिळवलेल्या यशाचा,
सिद्ध केलेल्या कर्तृत्वाचा, चाकोरी ओलांडून केलेल्या कामांचा
आणि वंचितांच्या हाकेला धावून जाणाऱ्या सूर्यवंशजांचा..
हा आहे उत्तुंगतेला गवसणी घालणाऱ्या अव्वल प्रतिभावंत, विज्ञानयोगी,
कर्मतपस्वी समाजबांधवांचा जयघोष करण्याचा मंगलयोग
आणि हाच आहे द्विशतकोत्तर महोत्सवाची मुहूर्तमेढ रोवण्याचा संकल्प क्षण...
भावी यशाचा, सामूहिक कर्तृत्त्वशक्ती वृद्धिंगत करण्याचा,
जीवनाच्या सर्व क्षेत्रात तेजोमय विजय संपादन करण्याचा
आणि समाजातील ऐक्य दृढ करण्यासाठी संकल्पबद्ध होण्याचा
आजचा हा क्षण !!!



शतकोत्तर अमृत महोत्सव

आपल्या समाजाच्या पुर्वजांनी इसवी सन १८४५ रोजी  स्थापन केलेल्या समाजसंस्थेस सन २०२० मध्ये १७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. गेली दोन वर्षे करोनाच्या साथीमुळे हा सोहळा ठरल्याप्रमाणे करता आला नाही. आता मात्र या महामारीरूपी अंधाराचे जाळे पूर्ण फिटले असून नवचैतन्याची पहाट उगवत असताना आम्ही आपणांस आनंदाने कळवू इच्छितो की हा शतकोत्तर अमृत महोत्सव सोहळा, शुक्रवार दिनांक २३ डिसेंबर ते रविवार दिनांक २५ डिसेंबर २०२२ ह्या तीन दिवसांच्या कालावधीत आयोजित केला आहे. या तिन्ही दिवशी कार्यक्रमांची सुरुवात दुपारी चार वाजल्यापासून होईल. कार्यक्रमाची रूपरेषा मागे दिल्याप्रमाणे राहिल.

हा शतकोत्तर अमृत महोत्सव सोहळा साजरा करण्यासाठी समाज बंधु-भगिनींनी बहुसंख्येने सहभागी व्हावे ही आग्रहाची विनंती आम्ही विश्वस्त मंडळातर्फे करीत आहोत. आपण या  विनंतीला मान देऊन प्रत्यक्ष उपस्थित राहून सोहळ्यांचा आनंद द्विगुणित कराल, हि अपेक्षा!

आपले स्नेहांकित,

**श्री. रमाकांत रामचंद्र रात**
प्रमुख संयोजक
शतकोत्तर अमृत महोत्सव
सोहळा

**श्री. प्रविण महादेव महाले**
अध्यक्ष

**श्री. दत्तात्रय यादव दळवी**
चिटणीस

**सूर्यवंशी क्षत्रिय ज्ञाती समाज**
**विश्वस्त मंडळ, मुंबई.**

## कार्यक्रमाची रूपरेषा

शतकोत्तर अमृत महोत्सव

### शुक्रवार दि. २३ डिसेंबर २०२२

- स्वागत
- दीप प्रज्वलन
- ईशस्तवन
- स्मरणिका प्रकाशन
- वैवाहिक जीवनाची ५० वर्षे पूर्ण केलेल्या दांपत्यांचा सत्कार
- मान्यवरांचे मनोगत
- प्रमुख पाहुण्यांचे भाषण
- समाजातील कलाकारांचे सांस्कृतिक कार्यक्रम

### शनिवार दि. २४ डिसेंबर २०२२

- विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान समाजमान्यवरांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार
- सांस्कृतिक व कलात्मक स्पर्धांत सहभागी समाजबांधवांचा सन्मान
- वाद्यवृंद / सांस्कृतिक कार्यक्रम

### रविवार दि. २५ डिसेंबर २०२२

- समाजबांधवांची भव्यदिव्य 'शोभायात्रा'
- "शतकोत्तर अमृत महोत्सव" यशस्वी करणाऱ्या कार्यकर्त्यांना समाजाचे स्मृतिचिन्ह देऊन गौरव
- प्रमुख पाहुणे व सद्गृहस्थांची भाषणे
- आभार प्रदर्शन
- राष्ट्रगीत

### विशेष सूचना

- शोभायात्रेत समाजबांधव पारंपरिक वेशभूषेत सहभागी होतील. शोभायात्रेत चित्ररथ, लेझीम पथक, ढोलताशा पथक, बँड पथक व समाजाची पारंपारिक वाद्ये यांचा समावेश असेल. हि शोभायात्रा माहीम, दादर, प्रभादेवी ह्या भागांत सुमारे दोन किलोमीटरच्या परिसरात फिरेल.
- वेळेनुसार कार्यक्रमपत्रिकेत बदल करण्याचा अधिकार आयोजकांना राहिल.
- ह्या कार्यक्रमाची माहिती हस्ते परहस्ते पत्रकांद्वारे व समाजमाध्यमांद्वारे (WhatsApp, Facebook, इ.) अधिकाधिक समाजबांधवांपर्यंत पोहोचवावी,  हि नम्र विनंती.

**सूर्यवंशी क्षत्रिय ज्ञाती समाज, मुंबई.**

सूर्यवंशी क्षत्रिय सभागृह मार्ग, स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, कॅटरींग कॉलेज समोर,
दादर (प), मुंबई - ४०० ०२८, दूरध्वनी : २४४५ ६४०९ / २४४४ २६४८
Email : suryavanshisds.2009@gmail.com